नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १९ Issue - 19 | वार - शनिवार दि. १३ जून २०२६ Blow- Saturday Date 13 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यातील सर्व ग्रामीण पाणीपुरवठा योजना सौर ऊर्जेवर आणणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




### पाणीपुरवठा योजनेच्या व्यवस्थापनासाठी तालुकास्तरावर युनिटची निर्मिती; ग्रामीण पेयजल धोरण सादरीकरण बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सध्या राज्यामध्ये कार्यान्वित असलेल्या अनेक पाणी पुरवठा योजनांच्या देयकांची थकबाकी वाढत आहे. यापुढे मात्र राज्यातील सर्व ग्रामीण पाणीपुरवठा योजना सौर ऊर्जेवर आणण्यात याव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वर्षा निवासस्थानी आयोजित ग्रामीण पेयजल धोरण बैठकीत दिले. तसेच याकरिता विभागाने सर्वंकष धोरण आखण्याच्या सूचनाही दिल्या.

बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील. राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पाणीपुरवठा योजनेचा स्रोत, योजनेवर अवलंबून असलेल्या नागरिकांची संख्या, मोटार पंपाची क्षमता, संपूर्ण योजनेसाठी लागणाऱ्या एकूण वीज युनिटची संख्या आदी लक्षात घेऊन महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून संपूर्ण योजनांसाठी सौर ऊर्जेचे धोरण तयार करावे. राज्यामध्ये कुठेही वीज देयकांच्या थकबाकीमुळे पाणीपुरवठा योजना बंद पडू नये, याची काळजी घ्यावी. केंद्र सरकारच्या निकषानुसार दरडोई दरदिवशी ५५ लिटर पाणी पुरविले पाहिजे, यानुसार योजना पूर्णत्वास न्याव्यात. सर्व ग्रामीण प्रादेशिक व स्वतंत्र पाणीपुरवठा पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी तालुका स्तरावर युनिटची स्थापना करण्यात यावी. या युनिटमध्ये तालुक्यातील ग्राम पंचायतींचा सहभाग घेण्यात यावा. पाणीपट्टीच्या वसुलीतून योजनेच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च करण्यात यावा. ज्या ठिकाणी पाणी कराची कमी वसुली असेल, अशा ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निधीमधून रक्कम उपलब्ध करून देण्यात यावी. अशा युनिटच्या माध्यमातून देखभाल दुरुस्तीची किंमतही कमी येईल आणि योजनाही बंद पडणार नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

तालुका स्तरावर युनिटच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी एजन्सीची सूची तयार करावी. ग्रामसभेच्या ठरावाने या सूचीमधील एजन्सीकडून पाणीपुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती करावी. या व्यवस्थेमुळे कुठलीही पाणीपुरवठा योजना देखभाल दुरुस्तीअभावी बंद पडणार नाही. ग्रामीण भागामध्ये पाणीपुरवठा योजनेचा स्रोत हा शाश्वत असला पाहिजे. काही ठराविक कालावधीने पुन्हा नवीन स्रोत शोधून पाणीपुरवठा योजना करण्यात येऊ नये. त्यामुळे आधीच्या योजनेवरील खर्चाचा उपयोग होत नाही. 'व्हीबी जी रामजी' या योजनेतून पाणीपुरवठ्याचे स्रोत सक्षमीकरण करण्यास निधीची उपलब्धता होत आहे, त्यामुळे योजनेच्या माध्यमातून अशा प्रकारे पाण्याच्या स्रोतांचे बळकटीकरण करण्यात यावे. ज्यामुळे भविष्यात पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित राहील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. पुनर्जोडणी योजनांबाबत सुचित करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ५० टक्क्यांचा वर काम पूर्ण झालेल्या पुनर्जोडणी योजनांना निधी देण्यात यावा आणि अशा योजना पूर्ण कराव्यात. जल जीवन मिशन अंतर्गत १०० टक्के काम पूर्ण झालेल्या योजनांची पडताळणी करण्यात यावी.

बैठकीत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन यांनी सादरीकरण केले. यावेळी अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकासचंद्र रस्तोगी, सचिव (नियोजन) शैला ए , (ग्रामविकास) चंद्रकांत पुलकुंडवार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सदस्य सचिव अमगोथू श्रीरंगा नायक आदी उपस्थित होते.

जल जीवन मिशन अंतर्गत एकूण ११ हजार ६४३ योजनांच्या यापूर्वीच त्यांच्या मूळ अंदाज पत्रकांमध्ये सौर यंत्रणा घेण्यात आली आहे. राज्यात एकूण २२,१८५ योजनाकरिता सौर यंत्रणा उभी करण्याचे प्रस्तावित आहे.

## बंगाल निवडणुकीत वापरलेले ४००० ईव्हीएम जळून खाक, सरकारी इमारतीला आग, घातपाताचा संशय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोलकाता : पश्चिम बंगालची राजधानी कोलकातामधून एक अत्यंत धक्कादायक आणि राजकीय वर्तुळात खळबळ माजवणारी घटना समोर आली आहे. कोलकाता येथील एका नऊ मजली सरकारी इमारतीला लागलेल्या भीषण आगीत तब्बल ४००० ईव्हीएम जळून खाक झाल्या आहेत. या ईव्हीएम विधानसभा निवडणुकीत वापरण्यात आल्या होत्या. या घटनेनंतर राजकीय वातावरणात आरोप-प्रत्यारोपांना उधाण आलं असून, प्रशासनानं या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. दक्षिण कोलकात्याच्या अलीपूर भागात असलेल्या एका सरकारी इमारतीला बुधवारी (१० जून) आग लागली होती. ही आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाच्या जवानांना तब्बल २४ तासांपेक्षा जास्त वेळ लागला. ज्या नऊ मजली इमारतीला आग लागली, त्यामध्ये इतर सरकारी विभागांशिवाय दक्षिण २४ परगणा जिल्हा परिषदेचं कार्यालय देखील भक्ष्यस्थानी पडलं. मशिन्स जळाल्याने या प्रकरणाला आता मोठे राजकीय वळण लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## राज्य सरकारचा निर्णय; राज्यातील सर्व ११६ दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई : महसूल विभागाच्या नियंत्रणाखाली असलेली सर्वच्या सर्व ११६ दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. परिणामी, ब्रिटिश काळापासून चालत आलेली आणि स्वातंत्र्यानंतर सात दशकांहून अधिक काळ अस्तित्वात असलेली 'दुय्यम तुरुंग नियमपुस्तिका, १९५२' इतिहासजमा झाली आहे.

राज्यातील दुय्यम कारागृहांची सद्यःस्थिती आणि त्यांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी गृह विभागाने १७ ऑक्टोबर २०२३ रोजी एका विशेष अभ्यासगटाची स्थापना केली होती. या अभ्यासगटाने १० डिसेंबर २०२४ रोजी आपला अंतिम अहवाल सरकारला सादर केला. या अहवालावर अपर मुख्य सचिव (महसूल) आणि अपर मुख्य सचिव (गृह) यांच्यात ५ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत सखोल चर्चा झाली. सध्या राज्यातील एकूण ११६ दुय्यम कारागृहांपैकी तब्बल ८० कारागृहे आधीच बंद अवस्थेत पडलेली आहेत. तर उर्वरित ३६ कारागृहे तांत्रिकदृष्ट्या कार्यरत असली, तरी ती सुस्थितीत नसल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर, गृह विभागाच्या अभिप्रायानंतर सरकारने ही सर्व दुय्यम कारागृहे कायमची बंद करण्याचा निर्णय घेतला. या दुय्यम कारागृहांमध्ये सद्यस्थितीत दाखल असलेल्या कैद्यांना संबंधित जिल्ह्यातील जिल्हा कारागृह किंवा मध्यवर्ती कारागृहांमध्ये तातडीने रवानगी करण्याची जबाबदारी गृह (कारागृह) विभागाला देण्यात आली आहे. या दुय्यम कारागृहांसाठी गृह विभागाची लिपिक संवर्गातील (वर्ग-३) एकूण ६ पदे मंजूर होती. ही पदे श्रीरामपूर (अहिल्यानगर), महाड (रायगड), मालेगाव (नाशिक), तळोदा (नंदुरबार), कराड (सातारा) आणि उदगीर (लातूर) या ठिकाणी मंजूर असून सद्यस्थितीत ती रिक्त आहेत.




### एफडीएच्या अधिकाऱ्यांनाही इशारा

## तुकाराम मुंढे पुन्हा ॲक्शन मोडमध्ये; गुटखा विक्रेत्यांवर आता मकोका लागणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील धडाडीचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी जबाबदारी सांभाळताच, कारवाईचा धडाका सुरू केला आहे. गेल्या महिनाभरात तुकाराम मुंढेंनी एकापाठोपाठ एक कारवाया करत ३ कोटी २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून ३५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईनंतरही राज्यातील काही ठिकाणी अवैध गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांची विक्री होत असल्याने आता आयुक्त मुंढे आणखी ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. आता, उत्पादकापासून ते विक्री करणाऱ्यापर्यंत सगळ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याचे तुकाराम मुंढेंनी म्हटलं.

तुकाराम मुंढे यांनी चार्ज घेतल्यापासून अन्न व औषध विभागाने राज्यभरात अनेक ठिकाणी धाडी टाकून भेसळीचा माल जप्त केला आहे. संबंधित विक्रेत्यांना अटक करुन त्यांच्यावर गुन्हेही दाखल झाले आहेत. वर्तमानपत्रात -खाद्यपदार्थ विकणारे विक्रेते अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या (एफडीए) रडारवर आले आहेत. खाद्यपदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळून विकू नका, अशी सक्त ताकीदही खाद्यविक्रेत्यांना देण्यात आली आहे. आता, गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटित नेटवर्कविरुद्ध पात्र प्रकरणांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ (मकोका) लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना तुकाराम मुंढेंनी निर्देश दिले आहेत. उत्पादकापासून ते विक्री करणाऱ्यापर्यंत सगळ्यांना हा नियम लागू असून मकोका कायद्यानुसार गुन्हा दाखल केला जाईल. मकोका गुन्हा दाखल करण्यासाठी आरोपीचा इतिहास पाहून आवश्यक त्या गुन्ह्यानुसार कारवाई केली जाणार, असल्याचे तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले.

गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थाचे उत्पादन, साठवून, वाहतूक , वितरण आणि विक्री करणाऱ्या संघटीत नेटवर्क विरोधात मकोका लागू करण्याचे आदेश तुकाराम मुंढेंकडून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. ही संघटित गुन्हेगारी आहे, त्यामध्ये विक्री करणारा आणि विकत घेणारा देखील जबाबदार आहे, अशी माहिती तुकाराम मुंढेंनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच, यामध्ये आमचे काही अधिकारी देखील इनवॉल्ड आहेत, असे आरोप होत आहेत. मात्र, याची देखील चौकशी आम्ही करतोय, अधिकारी जर सहभागी असल्याचे आढळले तर तुम्हाला सांगण्यात येईल, त्यांच्यावरही कारवाई केली जाईल, असा सज्जड दमच मुंढेंनी दिला आहे.

तुकाराम मुंढेंनी पदभार स्वीकारल्यानंतर २५ मे ते ११ जून या कालावधीत प्रतिबंधक गुन्ह्यामध्ये ३ कोटी २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यामध्ये, ३५ जणांवर गुन्हे दाखल असून ३५० जणांना अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, मला कोणतीही धमकी आली नाही, मला धमकी आल्यासंदर्भातील तो व्हीडिओ जुना असून कदाचित पुण्यातला असेल, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी स्वत: आजच्या पत्रकार परिषदेत दिली.

## संपादकीय....

# भेसळीवर कारवाई तीव्र

राज्यातील धडाडीचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी जबाबदारी सांभाळताच, कारवाईचा धडाका सुरू केला आहे. गेल्या महिनाभरात तुकाराम मुंढेंनी एकापाठोपाठ एक कारवाया करत ३ कोटी २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून ३५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईनंतरही राज्यातील काही ठिकाणी अवैध गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांची विक्री होत असल्याने आता आयुक्त मुंढे आणखी ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. आता, उत्पादकापासून ते विक्री करणाऱ्यापर्यंत सगळ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. तुकाराम मुंढे यांनी चार्ज घेतल्यापासून अन्न व औषध विभागाने राज्यभरात अनेक ठिकाणी धाडी टाकून भेसळीचा माल जप्त केला आहे. संबंधित विक्रेत्यांना अटक करुन त्यांच्यावर गुन्हेही दाखल झाले आहेत. वर्तमानपत्रात -खाद्यपदार्थ विकणारे विक्रेते अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या (एफडीए) रडारवर आले आहेत. खाद्यपदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळून विकू नका, अशी सक्त ताकीदही खाद्यविक्रेत्यांना देण्यात आली आहे. आता, गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटित नेटवर्कविरुद्ध पात्र प्रकरणांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ (मकोका) लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना तुकाराम मुंढेंनी निर्देश दिले आहेत. उत्पादकापासून ते विक्री करणाऱ्यापर्यंत सगळ्यांना हा नियम लागू असून मकोका कायद्यानुसार गुन्हा दाखल केला जाणार आहे.

# ओबीसी समाजाच्या हक्कांचा महान शिल्पकार : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ऐतिहासिक योगदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय समाजव्यवस्थेत हजारो वर्षे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विषमतेमुळे वंचित राहिलेल्या बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी ज्यांनी आयुष्यभर संघर्ष केला, त्या महामानवाचे नाव म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर. अनेकदा बाबासाहेबांचे कार्य केवळ अनुसूचित जाती-जमातींपुरते मर्यादित असल्याचा गैरसमज निर्माण केला जातो. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, बाबासाहेबांचे विचार, संघर्ष आणि घटनात्मक योगदान हे ओबीसी, भटके-विमुक्त, अल्पसंख्याक, महिला आणि सर्वच वंचित घटकांच्या सामाजिक न्यायासाठी होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील विषमतेची मुळे शोधताना जातिव्यवस्थेचे सखोल विश्लेषण केले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना समान संधी दिल्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. आज ओबीसी समाजाला मिळणाऱ्या अनेक घटनात्मक अधिकारांच्या पायाभरणीमध्ये बाबासाहेबांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून बाबासाहेबांनी संविधानामध्ये सामाजिक न्यायाला सर्वोच्च स्थान दिले. राज्यघटनेतील कलम १५(४), १६(४), ४६ यांसारख्या तरतुदींमुळे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांना विशेष संरक्षण व संधी उपलब्ध करून देण्याचा मार्ग खुला झाला. याच घटनात्मक तत्त्वांवर पुढे ओबीसी आरक्षणाची संपूर्ण रचना उभी राहिली.

बाबासाहेबांनी मागासवर्गीय समाजाच्या प्रश्नांना राष्ट्रीय पातळीवर मांडले. त्यांनी शिक्षणाला मुक्तीचे शस्त्र मानले आणि शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला. हा संदेश केवळ एका समाजासाठी नसून सर्व वंचित, शोषित आणि मागास घटकांसाठी होता. आज ओबीसी समाजातील लाखो युवक-युवती शिक्षण, प्रशासन, उद्योग, राजकारण आणि विविध क्षेत्रांमध्ये पुढे जात आहेत, त्यामागे बाबासाहेबांनी निर्माण केलेली घटनात्मक आणि वैचारिक पायाभरणी आहे.

महिलांच्या हक्कांप्रमाणेच सामाजिक न्यायाच्या लढ्यातही बाबासाहेबांनी व्यापक दृष्टिकोन स्वीकारला.

त्यांनी प्रतिनिधित्वाच्या संकल्पनेला महत्त्व दिले. सत्तेतील, प्रशासनातील आणि शिक्षणातील सहभागाशिवाय कोणत्याही समाजाचा विकास होऊ शकत नाही, ही त्यांची भूमिका होती. त्यामुळेच आज ओबीसी समाजाला राजकीय व सामाजिक क्षेत्रात मिळालेल्या संधींची मुळे बाबासाहेबांच्या विचारांत आढळतात.

मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी अनेक दशकांनंतर झाली असली तरी त्यामागील सामाजिक न्यायाची मूलभूत संकल्पना बाबासाहेबांच्या विचारधारेतूनच प्रेरित झालेली होती. मागास वर्गांना संधी मिळाल्या पाहिजेत, त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे, ही बाबासाहेबांची भूमिका आजही तितकीच महत्त्वाची आहे.

आज ओबीसी समाजाने बाबासाहेबांचे योगदान केवळ आरक्षणाच्या चौकटीत न पाहता त्यांच्या व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. त्यांनी दिलेला शिक्षण, संघटन, वैज्ञानिक दृष्टीकोन, स्वाभिमान, समता आणि बंधुतेचा संदेश स्वीकारल्याशिवाय खऱ्या अर्थाने सामाजिक मुक्ती शक्य नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते; ते भारतातील सर्व वंचित, शोषित आणि मागास घटकांच्या न्याय्य हक्कांचे सर्वात मोठे पुरस्कर्ते होते. म्हणूनच ओबीसी समाजाच्या प्रगतीचा इतिहास लिहिताना बाबासाहेबांचे योगदान सुवर्णाक्षरांनी लिहावे लागेल.

ज्यांनी वंचितांना अधिकार दिले, ज्यांनी मागासांना संविधानिक संरक्षण दिले आणि ज्यांनी सामाजिक न्यायाला राष्ट्रजीवनाचा आधार बनविले, त्या महामानवाला विनम्र अभिवादन.

**– प्रा. डॉ. शहाजी चंदनशिवे**
**राज्य समन्वयक, फुले-आंबेडकर विद्वत सभा, महाराष्ट्र राज्य.**

# रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभाग (सातारा) विभागीय समन्वय समिती सदस्यपदी संभाजी शिंदे यांची निवड; श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीतर्फे सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पंढरपूर विभाग जिल्हाप्रमुख, पंचायत समितीचे माजी सदस्य तथा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य संभाजी हिरालाल शिंदे यांची आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था म्हणून ओळख असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभाग (सातारा) विभागीय समन्वय समिती सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले.

मागील २५ वर्षांच्या सामाजिक व राजकीय जीवनात शिवसेनेचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून संभाजी शिंदे यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग, गरजू नागरिकांना वेळोवेळी मदतीचा हात, तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने केलेला पाठपुरावा यामुळे त्यांना समाजात विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. पक्ष संघटनेचे कार्य करत असताना सर्व पक्षांतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांशी त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध जोपासले आहेत.

तसेच, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी मंदिर प्रशासन, भाविकांच्या सोयी-सुविधा, मंदिर परिसरातील विकासकामे, विविध धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रम तसेच मंदिराशी संबंधित जनहिताच्या विषयांमध्ये सक्रिय सहभाग घेत मोलाचे योगदान दिले आहे. भाविकांच्या सुविधा वाढविणे, मंदिराच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणे आणि प्रशासन व नागरिक यांच्यात समन्वय राखणे या माध्यमातून त्यांनी मंदिर समितीच्या कामकाजात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांची रयत शिक्षण संस्थेच्या विभागीय समन्वय समिती सदस्यपदी निवड करण्यात आल्याबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.



या निवडीबद्दल श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची प्रतिमा, तुळशीहार व उपरणे देऊन संभाजी शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मंदिर समिती सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), सल्लागार परिषद सदस्य ह.भ.प. महादेव महाराज शिवणीकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार तसेच मंदिर समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## बोपगांव येथे ग्रामपंचायत निवडणूक २०२६ वार्ड आरक्षण सोडत जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२६ वार्ड आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर झाल्याप्रमाणे मौजे बोपगांव ग्राम पंचायत वार्डनिहाय आरक्षण सोडत पुढील प्रमाणे.

वार्ड नं १

१) सर्वसाधारण स्त्री २) सर्वसाधारण स्त्री ३)सर्वसाधारण

वार्ड नं २

१) नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री २) सर्वसाधारण स्त्री ३) सर्वसाधारण

वार्ड नं. ३

१) नागरिकांचा मागास प्रवर्ग २)सर्वसाधारण स्त्री ३) सर्वसाधारण

अध्याशी अधिकारी श्री संदीप लोंढे व सहाय्यक महसूल अधिकारी श्री कल्पेश कटारे तशेच ग्रामविकास अधिकारी सौ राखी ढगारे यांच्या उपस्थिती त ग्राम पंचायत कार्यालय बोपगांव येथे अद्विता सागर फडतरे या लहान मुलीच्या हस्ते चिठी काढून आरक्षण जाहीर करण्यात आले.

यावेळी प्रशासक सरपंच सौ सारिका गुरव, माजी जि. प. स्वीकृत सदस्य योगेश नाना फडतरे, दादा सदाशिव जगदाळे, युवा नेते गणेश दिगंबर फडतरे, माजी ग्राम पंचायत सदस्य तुळशीराम गोफणे, मसकू अप्पा फडतरे, नंदू फडतरे, कृष्णा गुरव, काळुनाना पवार, बाबुशेठ फडतरे, शामराव फडतरे, माजी सरपंच खंडू नाना फडतरे, भाऊसाहेब फडतरे, माऊली कदम, सोनबा सर, माऊली कदम, विजय ल. फडतरे, गणेश फडतरे, पोलीस पाटील विनायक गायकवाड, अमित जगदाळे इत्यादी ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.




# विधान परिषद उमेदवार राजेंद्र राऊत यांच्या विजयासाठी शिवसेना पूर्ण ताकतीने मैदानात उतरणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर येथील बालाजी सर्व हॉटेलमध्ये शिवसेनेच्या जिल्ह्यातील नगरसेवक नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष जिल्हा परिषद सदस्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत माहितीचे अधिकृत उमेदवार राजेंद्र रावते यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

शहाजी बापू पाटील म्हणाले, राजेंद्र राहू दे संघर्षातून घडलेली नेतृत्व आहे. त्यांच्या विजय उमेदवारी जाहीर झाल्याच दिवशी निश्चित झाला असून आता केवळ औपचारिकता बाकी आहे सांगोला तालुक्यातून सर्व ३४ मते राजेंद्र राऊत यांनाच मिळतील शिवसेनेसाठी एकनाथ शिंदे साहेबांचा शब्द अंतिम असून एका मताचाही फरक पडणार नाही.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले स्थानिक निवडणुकीमध्ये काय झाले अपेक्षा भविष्यातील विकास महत्त्वाचा आहे महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे विकास निधीच्या बाबतीत कोणतेही कमतरता वासू दिली जाणार नाही.

उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सावंत म्हणाले शिवसेना माहिती सोबत उभी राहील राजेंद्र राऊत यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्यासाठी शिवसैनिक प्रयत्नाची पराकाष्टा करतील.

उमेदवार राजेंद्र राऊत यांनी विचार व्यक्त करताना जिल्ह्यामध्ये माहिती माझ्या पाठीमागे असून माजी आमदार शहाजी बापू पाटील साहेब व पालकमंत्री जयकुमार गोरे सारखी मातब्बर मंडळी सोबत असल्यामुळे सर्वांचा आशीर्वाद मिळेल हीच अपेक्षा आहे अशी भूमिका व्यक्त केली.

बैठकीत उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सावंत पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैरशील माने, माढा लोकसभा संपर्कप्रमुख पैलवान चंद्रहार पाटील, शिवसेना उपनेते माजी आमदार शहाजी बापू पाटील माझ्या आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित जिल्ह्यातील तसेच सांगोल्यातील नगरसेवक जिल्हा परिषद सदस्य नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांनी राजेंद्र राऊत यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा विश्वास व्यक्त केला.

# लॅपटॉपमुळे डिजिटल कृषी प्रशासनाला चालना - कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**शेतकऱ्यांना योजनांचा लाभ अधिक वेगाने मिळणार**

**दहा वर्षाच्या मागणीला यश; १३,२७५ क्षेत्रीय कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांना मिळणार अत्याधुनिक लॅपटॉप**

**पंधरा दिवसांत क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना लॅपटॉपचे वितरण**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र हे खास कृषीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरण स्वीकारणारे देशातील पहिले राज्य आहे. शासनाच्या कृषी योजनांची अंमलबजावणी आणि लाभार्थी सेवा आता मोठ्या प्रमाणावर डिजिटल माध्यमातून होत आहेत. त्यामुळे कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करणे ही काळाची गरज आहे. क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना लॅपटॉपसारखी आवश्यक डिजिटल साधनसामग्री उपलब्ध झाल्यामुळे योजनांची माहिती तात्काळ ऑनलाइन नोंदविणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि शेतकऱ्यांच्या अर्जांवर तत्पर कार्यवाही करणे अधिक सुलभ होणार आहे. परिणामी, शेतकऱ्यांना योजनांचा लाभ मिळण्यास होणारा विलंब कमी होऊन सेवा वितरण अधिक वेगवान आणि प्रभावी होईल. अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

राज्यातील १३,२७५ क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना लॅपटॉप उपलब्ध करून देण्यासाठी १०९ कोटी रुपयांच्या निधीस शासनाने मान्यता दिली आहे. सदर लॅपटॉपचा पुरवठा जुलै २०२६ अखेर पूर्ण होण्याचे नियोजन असून ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांपर्यंत ते पोहोचविण्यात येतील. पुरवठादाराकडून प्राप्त होणाऱ्या प्रत्येक लॅपटॉपची १०० टक्के गुणवत्ता तपासणी करण्यात येणार असून ही तपासणी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे या स्वतंत्र त्रयस्थ संस्थेमार्फत केली जाणार आहे.


कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली १३,२७५ क्षेत्रीय कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक लॅपटॉप देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कृषी विभागाच्या विविध योजना आणि उपक्रमांची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणावर डिजिटल माध्यमातून होत आहे. महाडीबीटी पोर्टल, पीएम किसान योजना, पीक कापणी प्रयोग, पीक पेरणी नोंदी, किड व रोग सर्वेक्षण, महाकृषी प, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प, हवामान व आपत्कालीन संदेश, निविष्ठा नियोजन तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कृषी उपक्रमांची माहिती क्षेत्रीय स्तरावरून ऑनलाइन अद्ययावत करावी लागते.

सध्या या कामासाठी क्षेत्रीय कर्मचारी मोबाईलचा वापर करत असून अनेक वेळा कार्यालयातील संगणकांवर अवलंबून राहावे लागते. तसेच गुगल स्प्रेडशीटसह विविध डिजिटल प्रणालींमध्ये माहिती अद्ययावत करण्यासाठी तालुका किंवा मंडळ कार्यालयात जावे लागत असल्याने कामकाजावर परिणाम होत होता. या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय कर्मचारी वर्गात लॅपटॉप पुरवठा करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटना २०२१ पासून तसेच कृषी पर्यवेक्षक संघटना २०२३ पासून करते आहे. या संघटनांसोबत आयुक्तालय स्तरावर तसेच मंत्रालय स्तरावर बैठका घेऊन त्यांची अडचण व मागणी समजावून घेण्यात आली आहे. या मागणीची दखल घेत शासनाने २०२५-२६ मध्ये या प्रस्तावाला प्राधान्याने मान्यता दिली.

या संदर्भात आवश्यक तांत्रिक विनिर्देश इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून निश्चित करण्यात आले आहेत. तसेच खरेदी प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता आणि स्पर्धात्मकता राखण्यासाठी शासकीय ई मार्केटप्लेस (ऋशच्) पोर्टलवर निविदा प्रक्रिया राबवून पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. राज्यातील १०,६२० सहाय्यक कृषी अधिकारी, १,७७० उपकृषी अधिकारी आणि ८८५ मंडल कृषी अधिकारी अशा एकूण १३,२७५ अधिकारी व कर्मचाऱ्यांना हे लॅपटॉप वितरित केले जाणार आहेत. या सुविधेमुळे क्षेत्रीय स्तरावरील कामकाज अधिक सुलभ होणार असून योजनांची अंमलबजावणी, तपासण्या, माहिती संकलन व अहवाल सादरीकरण यामध्ये मोठ्या प्रमाणावर वेग आणि अचूकता येणार आहे.

यापूर्वी नोव्हेंबर २०२५ पासून क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना १२,३७३ सिमकार्डचे वितरण करण्यात आले असून एप्रिल २०२६ मध्ये तालुकास्तरावर ४४४ नवीन संगणक उपलब्ध करून देण्यात



आले आहेत. आता लॅपटॉप वितरणामुळे कृषी विभागाच्या डिजिटल सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला आणखी बळ मिळणार असून शेतकरी हिताच्या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पावसाळी अधिवेशनात सादर होणार महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक : मुख्यमंत्री

## महिला शेतकऱ्यांना मिळणार स्वतंत्र ओळख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' पावसाळी अधिवेशनात सादर केले जाणार आहे. महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाला चालना मिळावी यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थान येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक सादरीकरण झाले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील कृषी क्षेत्रात ८१ टक्क्यांहून अधिक महिलांचा सहभाग आहे. बहुतांश कृषी धोरणे व शासकीय योजना पुरुषकेंद्री आहेत. कृषी योजनांचा लाभ महिलांना मिळावा यासाठी जमिनीची मालकी ही अट असल्याने मोठ्या संख्येने महिला शेतकरी योजनांपासून वंचित राहतात. कुटुंबाच्या किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या महिला, तसेच मत्स्यव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, वनउपज संकलन यांसारख्या पूरक व्यवसायांमध्ये कार्यरत महिलांनाही शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. या पार्श्वभूमीवर हे विधेयक तयार करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्व सूचनांचा विचार करून विधेयकाचा अंतिम मसुदा तयार करा.कृषी क्षेत्रातील महिलांना 'शेतकरी' म्हणून वैधानिक मान्यता देणे, त्यांच्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभारणे, कर्ज, तंत्रज्ञान, बाजारपेठ व विविध सेवा महिलांपर्यंत पोहोचविणे हा उद्देश असावा. पारंपरिक शेतीबरोबरच पशुपालन,




दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, बागायती, फुलशेती, मशरूम उत्पादन, कृषी वनीकरण, वनउपज संकलन अशा विविध उपक्रम तसेच भूमिहीन शेतकरी, भाडेकरू शेतकरी, शेतमजूर, चराई व्यवसाय करणारे आणि स्थलांतरित कृषी कामगार यांचाही यामध्ये समावेश करावा. महिलांना राज्य शासनाच्या कर्ज योजना, कृषी अनुदाने, बियाणे, खते, पीक विमा, विस्तार सेवा, बाजारपेठ सुविधा, वाहतूक, साठवणूक आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळू शकेल अशी डिजिटल प्रभावी यंत्रणा कार्यान्वित होण्यासाठी सर्व अभ्यास करावा. महिला शेतकऱ्यांचा स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार करणे या बाबींचा समावेश करावा.

'महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र 'महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी'

महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र 'महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी' स्थापन करणे, विधेयकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यंत्रणा यांचा देखील अभ्यास केला जावा. जिल्हा आणि तालुका व गावस्तरापर्यंत मजबूत यंत्रणा असली पाहिजे. या कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय देखरेख समिती असावी जेणेकरून या कायद्याच्या अंमलबजावणीचे नियमित परीक्षण करेल. हे विधेयक राज्यातील लाखो महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख, हक्क आणि संधी उपलब्ध करून देणारे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असून कृषी क्षेत्रात लिंगसमतेच्या दिशेने एक नवा आदर्श निर्माण करेल असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

यावेळी महिला सक्षमीकरण विधेयकाचे सादरीकरण कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह यांनी केले.

या बैठकीला मुख्यमंत्र्याचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकास चंद्र रस्तोगी, नियोजन विभागाच्या सचिव ए शैला, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, विधि व न्याय विभागाच्या सचिव सुप्रिया धावरे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, ग्राम विकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, पदुम विभागाचे सचिव डॉ एन.रामास्वामी, महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ.अनुप कुमार यादव, व्ही.सी.व्दारे एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या अध्यक्ष डॉ. सौम्या स्वामीनाथन, विधि सेंटर फॉर लीगल पॉलिसीच्या जिनाली दानी तसेच एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या प्रतिनिधी तेजश्री उपाध्ये आणि दर्शिता तुमणे यावेळी उपस्थित होते.

# नैताळे शिवारात मध्यरात्री चोरट्यांचा धुमाकूळ..!

## दोन ठिकाणी घरफोडी, एकास मारहाण करून दागिने व रोकड लंपास



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गालगत असलेल्या नैताळे शिवारात गुरुवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत पाच ते सहा ठिकाणी चोरीचे प्रयत्न केले. यापैकी दोन ठिकाणी घरफोडी करण्यात यश मिळवत लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास केली. तसेच चोरीला विरोध करणाऱ्या एका व्यक्तीस दगडाने मारहाण करून जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकारामुळे नैताळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

या बाबत मिळालेल्या माहितीनुसार, नैताळे गावाजवळील माजी सरपंच दादा बाबुराव बोरगुडे यांच्या वस्तीवर गुरुवारी मध्यरात्री साडेबारा ते एक वाजेच्या सुमारास चार ते पाच अज्ञात चोरटे दाखल झाले. त्यांनी घराच्या ओसरीतून प्रवेश करून घरातील सदस्य झोपेत असतानाच आतील खोल्यांचे दरवाजे बाहेरून बंद केले. त्यानंतर ओसरीजवळ ठेवलेल्या दोन पेट्या बाहेर नेऊन त्यातील सुमारे दीड तोळे सोन्याचे दागिने व अंदाजे तीन हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेली.



दरम्यान, परिसरात चोरटे असल्याची शेजारच्यांना मिळताच ग्रामस्थांनी शोधमोहीम सुरू केली. मात्र चोरट्यांनी आपला मोर्चा शिवरे रस्त्यालगत असलेल्या धनंजय दादा बोरगुडे व शंकर पुजाराम कवडे यांच्या वस्तीकडे वळवला. तेथे चोरी करणे शक्य नसल्याचे लक्षात येताच त्यांनी घरांचे दरवाजे बाहेरून बंद करून पुढील ठिकाणी कूच केली.यानंतर चोरटे नवनाथ जयराम बोरगुडे यांच्या वस्तीवर पोहोचले. रात्री दोन ते अडीच वाजेच्या सुमारास त्यांनी घराचे दरवाजे उघडण्याचा व चोरी करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याच वेळी शौचास गेलेल्या अभिषेक नवनाथ बोरगुडे यांच्या हा प्रकार लक्षात आला. त्यांनी प्रसंगावधान राखत व धाडस दाखवत चार चोरट्यांना प्रतिकार केला. अभिषेक यांच्या धाडसी प्रयत्नांमुळे चोरट्यांना तेथून पळ काढावा लागला. त्यांच्या या धाडसाचे परिसरात कौतुक होत आहे.चोरट्यांनी त्यानंतर नामदेव दगडू घायाळ यांच्या वस्तीकडे मोर्चा वळवला. मात्र घराजवळील कुत्रा जोरात भुंकू लागल्याने कुटुंबीय जागे झाले. त्यामुळे चोरट्यांचा डाव फसला आणि त्यांनी तेथूनही पळ काढला.यानंतर अडीच ते तीन वाजण्याच्या दरम्यान नैताळे-गाजरवाडी रस्त्यालगत असलेल्या साहेबराव शिवराम तुपलोंढे यांच्या वस्तीवर चोरटे दाखल झाले. त्यांनी घराच्या दरवाज्याचा कडी-कोयंडा कटवणीच्या सहाय्याने तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटे व पेट्यांची झडती घेत त्यांनी बेबीबाई तुपलोंढे यांची दीड तोळे सोन्याची पोत, दोन तोळे सोन्याचे टॉप्स व वेल, तीन तोळ्यांचे मणीमंगळसूत्र, पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, १२ भार वजनाच्या चांदीच्या तोरड्या तसेच सुमारे ७० हजार रुपयांची रोख रक्कम असा ऐवज लंपास केला.दरम्यान, साहेबराव तुपलोंढे यांनी चोरट्यांना विरोध करण्याचा प्रयत्न केला असता चोरट्यांनी त्यांच्यावर दगडाने हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या दाढीच्या भागाला, छातीला तसेच कानामागे दुखापत झाली.जखमी अवस्थेत त्यांनी आरडाओरड केल्यानंतर परिसरातील नागरिक जागे झाले. त्यानंतर चोरट्यांनी धारणगाव रस्त्याच्या दिशेने पलायन केले.घटनेची माहिती मिळताच निफाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी कांतीलाल पाटील, पोलीस निरीक्षक गणेश गुरव व त्यांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपास सुरू केला जखमी साहेबराव तुपलोंढे यांना निफाड ग्रामीन रुग्नालयात नेऊन उपचार करण्यात आला. तसेच यावेळी स्वान पथकाला पाचारण करण्यात आले. स्वान पथकाने चोरट्यांचा माग धारणगाव रोडलगत असलेल्या जनता विद्यालय परिसरापर्यंत शोधून काढल्याची माहिती मिळाली.नैताळे शिवारात एका रात्रीत अनेक ठिकाणी चोरीचे प्रयत्न व दोन ठिकाणी यशस्वी घरफोडी झाल्याने ग्रामीण भागातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून रात्रीच्या गस्तीत वाढ करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक गणेश गुरव स्वतः करीत असून अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी विविध पथके कामाला लागली आहेत. लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

# टाकळीवाडीच्या ग्रामपंचायतीवर कोणाची येणार सत्ता...? चर्चेला उधाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी:टाकळीवाडी ता. शिरोळ ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून ग्रामपंचायतीवर यंदा कोणाची सत्ता येणार याबाबत नागरिकांमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे. विविध राजकीय गट, स्थानिक नेते आणि इच्छुक उमेदवारांनी मोर्चेबांधणी सुरू केल्याने निवडणुकीची रंगत दिवसेंदिवस वाढत आहे.

गावातील प्रमुख गटांकडून मतदारांशी संपर्क साधला जात असून विविध विकासकामांच्या मुद्द्यांवरून प्रचाराची रणनीती आखली जात आहे. तरुण मतदारांसह महिला मतदारांची भूमिका यंदा निर्णायक ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

गावाच्या विकासासाठी सक्षम नेतृत्वाची गरज असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत असून पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, शिक्षण आणि मूलभूत सुविधा हे मुद्दे निवडणुकीत केंद्रस्थानी राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, अद्याप अनेक गटांकडून उमेदवारांची अधिकृत घोषणा झालेली नसली तरी राजकीय हालचालींना वेग आला आहे. आगामी काही दिवसांत चित्र अधिक स्पष्ट होणार असून टाकळीवाडी ग्रामपंचायतीची सत्ता कोणाच्या हाती जाणार याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागून राहिले आहे.

## आंदोलनाने संबंधित प्रशासन खडबडून झाले जागे

# गोकुळ शुगर लि. थकीत ऊस बिल मागणीसाठी शेतकऱ्यानी कंबर तलावात केलेल्या जलसमाधी आंदोलनाला मिळाला प्रचंड प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : सोलापूर येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज कंबर तलावात,गोकुळ शुगर लि.धोत्री थकीत ऊस बिल मागणीसाठी दि.१०जून२६ रोजी शेतकऱ्यांनी केलेल्या जलसमाधी आंदोलनास प्रचंड प्रतिसाद मिळाला असून या आंदोलनाने संबंधित प्रशासन खडबडून जागे झाल्याचे दिसून येते.



गेल्या १७ ते १८दिवसापासून धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी, गोकुळ शुगर लि.धोत्री थकित ऊस बिल आंदोलन व शेतकरी संघर्ष समिती तुळजापूर आणि अक्कलकोट यांच्यावतीने सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांनी गोकुळ शुगर लिमिटेड धोत्री ला आपला ऊस गळपायासाठी दिला परंतु अध्याप त्यांना त्यांच्या हक्काचे ऊस बिल मिळाले नाही म्हणून आपले थकीत ऊस बिल मिळावे या प्रमुख मागणीसाठी जिल्हाधिकारी सोलापूर कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले होते.या आंदोलनाच्या सोळाव्या दिवशी दि१० जून २०२६ रोजी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी सोलापूर येथील कंबर तलावात लक्षवेधी जलसमाधी आंदोलन केले. सकाळी ठीक११.०० दरम्यान गोकुळ शुगर लि.च्या नावाने व संबंधित प्रशासनाच्या विरोधात बोंब ठोकून या आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. आंदोलनाच्या ठिकाणापासून ते कंबर तलावापर्यंत आंदोलनकर्ते शेतकऱ्यांनी ऊस बिल आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे कोण म्हणतंय देत नाही घेतल्याशिवाय राहत नाही गोकुळ शुगर चे करावं काय खाली मुंडके वर पाय अशा संतप्त जन आक्रोश करणाऱ्या घोषणा देत मोर्चाने कंबर तलावाकडे गेले व त्या ठिकाणी नियोजित जलसमाधी आंदोलन करून आता तरी आम्हाला आमच्या हक्काचे ऊस बिल द्या अशी जोरदार मागणी केली. यावेळी सोलापूर पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली या आंदोलनास चोक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नागरिकांनीही प्रचंड गर्दी करून या आंदोलनाचे समर्थन केले. एकंदरीत या आंदोलनाला सर्व थरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला असून या आंदोलनाने संबंधित प्रशासन शासन खडबडून जागे झाले असून तात्काळ सर्व शेतकऱ्यांना त्यांचे हक्काचे थकीत ऊस बिल दिले जाईल असे शासन व प्रशासनाकडून ठोस आश्वासन मिळाल्याने तुर्तास हे आंदोलन थांबविण्यात आले आहे.

# कवळी ग्रामपंचायतला लोकमत चा जिल्हास्तरीय ग्राम स्वच्छता पुरस्कार प्रदान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी अमर जाधव/सारणीकर : औसा तालुक्यातील कवळी गावात ग्राम स्वच्छतेसह विकासात्मक कामाला प्राधान्य दिले. त्यामुळे कवळी ग्रामपंचायतला लोकमतच्या वतीने जिल्हास्तरीय ग्राम स्वच्छता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे . हा पुरस्कार कवळी गावातील ग्रामस्थांच्या कार्याचा गौरव सरपंच राहीबाई लहू जगताप यांचे प्रतिपादन...........

औसा तालुक्यातील कवळी हे गाव विकासात्मक कामाकडे वाटचाल करत असून सरपंच राहीबाई लहू जगताप यांच्या नेतृत्वाखाली गेल्या चार वर्षात अनेक लोक हिताचे व लोकोपयोगी कामे करून तालुक्यात आपल्या गावच नावलौकिक करत स्वतः आपण महिला सरपंच असल्याने गावातील महिलांचे सक्षमीकरण करणे महिलांना उद्योजक करत स्वावलंबी बनवणे सोबतच गावातील विकासात्मक कामाला चालना देत जे जे नव ते. तें. कवळी गावला हवं या युक्तीप्रमाणे कवळी गावला डिजिटल बनवण्यासाठी गावात गाव सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीखाली आहे गावात डिजिटल करत स्मशानभूमी मध्ये वृक्ष लागवड पिण्याच्या पाण्याची सोय. गाव अतिक्रमण मुक्त करत पर्यावरणाचा समतोल जपत गावात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करत वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे मनत गाव हिरवं गार करण्यासाठी जास्तीत जास्त व्रक्ष लागवड करण्याचा संकल्प करत वृक्ष लागवड हेच ध्येय मनी बाळगून गावात वृक्ष लागवड केली आहे. यावेळी कवळी गावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी वेळोवेळी सहकार्य असणारे सरपंच सौ राहीबाई लहू जगताप. उपसरपंच सौ सुनिता महादेव जगताप.विनिया गोविंद शिंदे.स्वप्नाली विठ्ठल गायकवाड. माधुरी शिवशंकर माळी. शिवाजी लहू करंडे, समाधान बाबुराव जगताप.निवृती संभाजी भिसे, ग्रामविकास अधिकारी एन टी रायफळे, तंटामुक्ती अध्यक्ष भालचंद राम जगताप, रेखा यशवंत कोळी, दिपाली श्रीहरी काळे, पार्वती बालाजी जगताप, अर्चना शिंदे, सारिका जगताप, शुभांगी जगताप, माजी सरपंच सिद्देश्वर हरिभाऊ जगताप, मा. उपसपंच व्यंकट मारुती मोरे, महादेव जगताप, शिवाजी जगताप, नेताजी जगताप, गोविंद जगताप, उमेश जगताप, संजय जगताप, आकाश जगताप, अमोल जगताप, व्यंकट भाऊ माने, नरहरी दादा माळी, व्यंकट करंडे, शेषराव माळी. गोविंद शिंदे, ज्ञानेश्वर गायकवाड, संजय करंडे, अमोल भुजबळ, राघवेंद्र गायकवाड, तानाजी करंडे, ओमकार कुलकर्णी, राहुल जगताप, व्यंकट ठणके व आदी कवळी गावचे ग्रामस्थ व मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

# शहरातील दोन्ही उड्डाणपुलाच्या भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने करावी : जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन

## केंद्र शासनाच्या पोस्ट, रेल्वे, बीएसएनएल व रायफल ग्राउंड चे भूसंपादन बाकी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहरातील दोन्ही उड्डाणपुलासाठी केंद्र व राज्य शासनाच्या जागेच्या संपादनाची प्रक्रिया सर्व संबंधित विभागाने तातडीने करून घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित उड्डाणपूल भूसंपादन प्रक्रिया आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन बोलत होते. यावेळी सोलापूर मनपा आयुक्त सचिन ओंबासे, शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उप आयुक्त वृष्टी जैन, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, भूसंपादन अधिकारी प्रदीप बास्तेवाड, राष्ट्रीय महामार्गाचे अभियंता स्वप्नील पवार, महेश येमूल, सिटी सर्व्हे अधिकारी गजानन पोळ यांच्या सह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कार्तिकेयन म्हणाले की, सर्व शासकीय व खाजगी जागांच्या मिळकतीचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावेत. केंद्र शासनाच्या पोस्ट मध्य रेल्वे, बी एस एन एल व ग्राउंड जागेसाठी सोला-पूर महापालिका रेडीरेकनर दराप्रमाणे शुल्क देणार आहे. तसेच या जागेतून दुसऱ्या जागा साहित्य इतर ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी येणारा खर्चही महापालिका देईल. त्यामुळे संबंधित विभागाने त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडून जागा हस्तांतरित करण्याबाबतचे मान्यता घेऊन त्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावेत असे त्यांनी सांगितले.

यावेळी महापालिका आयुक्त सचिन ओंबासे यांनीही मार्गदर्शन केले.

सोलापूर शहरातील राष्ट्रीय महाम ार्ग प्राधिकरणामार्फत दोन महत्त्वाचे उड्डाणपुल प्रस्तावित आहेत. यात सेक्शन १ जुना पुना नाका ते पत्रकार चौक (५.४५ कि.मी.) व सेक्शन २ जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला (५.०० कि.मी.) या मार्गांचा समावेश आहे. महाराष्ट्र शास-नाने नगरोत्थान योजनेतून रु.२९९ कोटींची मंजुरी दिली असून शासन हिस्सा ७०% व महापालिका हिस्सा ३०% असा वित्तीय आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या सुधारीत आराखड्यानुसार भूसंपादनाचा खर्च रु.१४५.११ कोटी इतका आहे.

शासनाकडून आतापर्यंत रु.८४.४३८ कोटी प्राप्त झाले असून रु.१७.१३९ कोटी उर्वरित आहेत, तर महापालिकेच्या हिस्स्यातील रु.२५.५५ कोटी जमा झाले आहेत.या प्रकल्पासाठी एकूण १०.५५ हे.आर. क्षेत्राचे संपादन होणार असून त्यात खाजगी व शासकीय मिळकतींचा समावेश आहे. सेक्शन १ मध्ये १३७ मिळकतींपैकी १०० खाजगी व ३७ शासकीय तर सेक्शन २ मध्ये १०० मिळकतींपैकी ८७ खाजगी व १३ शासकीय मिळकती आहेत. आतापर्यंत सेक्शन १ मधील ६१ खाजगी मिळकतींचा ताबा घेण्यात आला असून सेक्शन २ मधील ताबा प्रक्रिया सुरू आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्य रेल्वे, बी.एस.एन.एल., तसेच पोलिस विभाग व वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागा बाधित झाल्या आहेत.

# बालहक्क जनजागृतीसाठी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्या हस्ते स्वाक्षरी मोहीमेचा शुभारंभ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जागतिक बालहक्क कामगार विरोधी दिनानिमित्त काम गार विभागाच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्या हस्ते या स्वाक्षरी मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात कामगार विभागाच्या वतीने लावण्यात आलेल्या बालहक्क कामगार विरोधी दिनाच्या फलकाचे फीत कापून उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले.

सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश झोले, सरकारी कामगार आधीकारी एस. बी. डोबरीयल, जिल्हा माहिला बाल विकास अधिकारी अविनाश मगर, धनाजी शिगाडे, लि. ट. प्रदीप पखमोडे, बाळासाहेब ठाकूर, राजेश्वर जाधव, गजानन मुंढे आदी उपस्थित होते.

यावेळी कामगार विभागाच्या वतीने या मोहिमेद्वारे नागरिकांना बालमजुरी निर्मूलनासाठी बांधिलकी दर्शविण्याचे आव-ाहन करण्यात आले. उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी पोस्टरवर स्वाक्षरी करून बालम जुरी विरोधी लढ्यात सहभाग नोंदवला. बालमजुरी ही सामाजिक समस्या असून तिचे निर्मूलन करण्यासाठी प्रशासनाबरोबरच सम ाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी व्यक्त केले. शिक्षण हीच खरी ताकद असून प्रत्येक बालकाला दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास दोन तोळे एक ग्रॅम सोने दान, कल्याणकर कुटुंबीयांचा अनोखा उपक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : येथील उद्य-ोजक प्रमोद कल्याणकर यांचे चिरंजीव काळेश्वर प्रमोद कल्याणकर यांच्या प्रथम वाढदिवसानिमित्त पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेऊन मंदिरात दोन तोळे एक ग्राम सोने दान केले आहे. सोने दान केल्यामुळे उद्योजक प्रमोद कल्याणकर यांची विठ्ठल रुक्मिणी मंदिर प्रशासनाच्या वतीने, यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीण कुमार घम, यांच्या वतीने सत्कार करण्यात आला, त्यांची कुटुंबीय उपस्थित होते उद्योजक प्रमोद कल्याणकर यांनी च्या वाढदिवसानिमित्त सोना ताई खर्च टाळून विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती प्रशासनात दोन तोळे सोने एक ग्राम असे सुपूर्द केले. त्याचा बाजार भाव तीन लाख रुपये ४० हजार रुपये आहे. त्यांच्या हा उपक्रम आणि त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# कोल्हाटी डोंबारी समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करु - आमदार सुनिल कांबळे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली समाजातील सर्व घटकांचा शैक्षणिक आर्थिक व सामाजिक विकास करुन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले जात आहे, त्या प्रमाणे कोल्हाटी डोंबारी समाजाचे सामाजिक प्रश्न सोडवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करु असे आश्वासन पुणे कॅन्टोन्मेंट मतदार संघाचे आमदार सुनिल कांबळे यांनी दिले,

सासवड येथे आचार्य अत्रे सभागृह वाघिरे विद्यालय येथे अखिल महाराष्ट्र कोल्हाटी डोंबारी संघटनेच्या वतीने भटके विमुक्त विकास परिषद व १० वी १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा ,व कलावंत व विविध क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी बोलताना,आमदार सुनिल कांबळे यांनी वरील आश्वासन दिले,

अखिल महाराष्ट्र कोल्हाटी डोंबारी समाज सघटना यांचे भटक्या विमुक्त पालावरील सम ाजातील उत्तीर्ण विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रामध्ये नेत्रदीपक कामगिरी करणा-या मान्यवरांना आमदार सुनिल कांबळे व मान्यवरांच्या शुभहस्ते शाल, पुष्पगुच्छ व खंडोबाची प्रतिमा भेट देवून सन्मानित करण्यात आले तसेच . १० वी, १२ वी उत्तार्ण विद्यार्थी, विद्यार्थीनींचा सन्मान शालेय साहित्य, रोख रक्कम, व कै. गोविंद रावळ यांचे स्मृतीचिन्ह देवून त्यांचा सन्मान करण्यात आला.

तसेच जेष्ठ तमाशा कलावंत पुष्पा यादव औधकर, बुवा डावळकर, गायिका भारती औधकर, विनायक कुडाळकर, शत्रुघ्न औधकर, शांताराम लाखे, माधुरी जावळेकर, माऊली जावळेकर, रमेश जावळे, सागर लाखे, विनायक कुडाळकर, अनिल दावळकर, गणेश कुडाळकर, अर्जुन कुडाळकर, यांना सन्मानीत करण्यात आले. यांना शाल पुष्पगुच्छ खंडेरायाची प्रतिमा देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात पुणे कॅन्टोन्मेंट मतदार संघाचे आमदार सुनिल कांबळे, भाजप प्रदेश चिटणीस ड. वर्षा डहाळे यांचे हस्ते दिप्रज्वलन करण्यात आले. , यावेळी पुणे महानगरपालिका नगरसेविका जोत्स्नाताई कुलकर्णी, डॉ. म दन कोठूळे, जगन्नाथ कुलकर्णी, सासवड नगरपालिकेचे नगरस-ेवक बाळासाहेब भिंताडे, डॉ. संजय रावळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी आमदार सुनिल कांबळे यांच्या शुभहस्ते रिपाइं नेते विष्णूदादा भोसले, जेष्ठ पत्रकार दत्तानाना भोंगळे पुणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनिल लोणकर रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे नेते गोविंद जगताप, कोडीत खुर्दचे पो-लीस पाटील उमेश तळेकर रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे सुधीर शेलार यांचा शाल पुष्पगुच्छ व मल्हारी मार्तंड यांची प्रतिमा देऊन विशेष सन्म ान करण्यात आला, यावेळी विविध मान्यवर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसचालन संघटनेचे सरचिटणीस मनोहर ताथवडकर यांनी केले. आभार जिल्हाध्यक्ष राजेंद्र जावळेकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अखिल महाराष्ट्र कोल्हाटी डोंबारी संघटनेचे प्रदेश सरचिटणीस मनोहर ताथवडकर यांच्या नेतृत्वाखाली परख औधकर, दत्ता गाडे, कुलदीप जावळेकर, राजू कुडाळकर, सुनिल देशपांडे, विकी पवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आयोजन अखिल महाराष्ट्र कोल्हाटी डोंबारी संघटनेच्या वतीने करण्यात आले होते.

## जाचक अटी व शर्ती काढून टाकून शेतकऱ्यांना कर्जमाफी करावी

# आ. रोहित पवारांची पंढरपूरमध्ये अन्नत्याग आंदोलन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य शासनाने कर्जमाफीमध्ये जाचक अटी व शर्ती मुळे बहुतांश शेतकरी कर्जमाफीमुळे वंचित राहणार आहेत. सरकारने शेतकऱ्यांना जातक अटी व शर्ती अन्य तात्याला विना आठ सरसकट कर्जमाफी, मिळावी व कर्जाचे पुनर्गठन करावी यासाठी आज दिनांक शुक्रवार दिनांक १२ रोज पंढरपूर येथे आमदार रोहित पवार अन्यथा आंदोलन सकाळी दहा वाजल्यापासून करणार आहे. त्याची छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये तयारी करण्यात आलेली आहे.

अधिक मासामुळे पंढरपूर मध्ये भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे प्रशासनावर मोठ्या प्रमाणात दान आहे. आमदार रोहित पवार यांनी विचार करावा असे सोलापूरचे जिल्हाधिकारी कार्ति केयन यांनी सांगितले.

या आंदोलनास गुरुवारी उशिरा पर्यंत परवानगी दिलेली नाही. एक तर जाचक अटी शर्ती काढा नाहीतर अन्य जगाला आंदोलनाला परवानगी द्या. परवानगी नाही दिली तर श्री नामदेव पायरी जवळ आंदोलन करणार आहे अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. पंढरपूर मध्ये शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी व्हावी व महाराष्ट्रे शासनाने घातलेल्या जाचक अटी व शर्ती काढून टाकून शेतकऱ्यांना कर्जमाफी करावी यासाठी आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे अन्न त्या आंदोलन केलेले आहे.

यावेळी उपस्थित माढा आमदार अभिजीत पाटील, मोहोळच्या आमदार राजू खरे, राष्ट्रवादी काँग्रेस उद्योग व्यापार प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष दीपक वाडदेकर, पंढरपूर तालुका शहर व राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. मंजुश्री कुलकर्णी यांचे निधन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेच्या माजी अध्यक्षा तसेच प्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ डॉ. मंजुश्री कुलकर्णी यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी शुक्रवार, दि. १२ जून २०२६ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. डॉ. कुलकर्णी यांनी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, रोटरी क्लब, फ ेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (FOGSI) तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन, सोलापूर शाखा आदी संस्थांम ध्ये विविध पदांवर कार्यरत राहून संस्थांच्या प्रगतीसाठी आणि आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी उल्लेखनीय योगदान दिले.

आपल्या सेवाभावी वृत्ती, मनमिळावू स्वभाव, मितभाषी व्यक्तिमत्त्व आणि रुग्णांप्रती असलेल्या आत्मीयतेमुळे त्या सर्वांच्या आदरास पात्र ठरल्या होत्या. वैद्यकीय क्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ व समर्पित सेवेम ुळे जनतेच्या डॉक्टर अशी त्यांची ओळख निर्माण झाली होती. त्यांच्या निधनाने वैद्यकीय, सामाजिक आणि सेवाभावी क्षेत्राची मोठी हानी झाली असून विविध स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.